विशेष

# रुंद वरंबा-सरी पद्धतीने करा हरभऱ्याची लागवड



**डॉ. राहुल चव्हाण**
(मो.नं. ९०९६३६२८२०)
विषयतज्ञ, कृषी अभियांत्रिकी विभाग,
कृषी विज्ञान केंद्र, यवतमाळ







रब्बी हंगामामध्ये हरभऱ्याची रुंद वरंबा-सरी पद्धतीने पेरणी करता येते; तसेच उन्हाळी भुईमूग रुंद वरंबा-सरी पद्धतीने घेता येतो. हरभरा पिकामध्ये रुंद वरंबा तयार करून, त्यावर हरभरा पिकाच्या ३ किंवा ४ ओळी ३० सें.मी. अंतरावर याप्रमाणे पेरणी करावी. यामध्ये ४ ओळी घ्यावयाच्या असतील तर पाच फुटांवर सऱ्या पाडाव्यात. ४ फुटांचा रुंद वरंबा (१२० सें.मी.) मिळतो. त्यावर दोन ओळींतील अंतर ३० सें.मी. ठेवावे. हरभरा पिकाच्या चार ओळी घ्यावयाच्या असतील तेव्हा ४ फुटांवर (१२० सें.मी.) सऱ्या पाडाव्यात. ३ फुटांचा (९० सें.मी.) रुंद वरंबा मिळतो. त्यावर ३० सें.मी. अंतरावर हरभरा पिकाच्या तीन ओळी घ्याव्यात.

**मा**गील दशकापासून होत असलेल्या हवामान बदलांमुळे पिकांच्या वाढीच्या व पक्वतेच्या काळात सरासरीपेक्षा कमी जास्त पाऊस होणे, दोन पावसांमध्ये दीर्घ खंड पडणे, जमिनीतील ओलावा कमी होणे इत्यादी कारणांमुळे पिकांच्या उत्पादनामध्ये घट येत असल्याचे आढळून आले आहे. महाराष्ट्रातील बहुतांश शेती पावसाच्या पाण्यावर अवलंबून असणारी जिरायती शेती असून, जमीन मध्यम ते भारी प्रकारामध्ये मोडते. कॅनॉलद्वारे व विहिरींद्वारे पिकांसाठी सिंचनाची सोय असलेला भाग वगळता इतर भाग फक्त पावसाच्या पाण्यावर अवलंबून आहे.

पावसाचे दीर्घकालीन खंड किंवा अधिकच्या पावसामुळे साचून राहणारे पाणी यामुळे पीकवाढ व उत्पादनावर विपरित परिणाम होतो. उत्पादनात घट येते. अशा वेळी पडणाऱ्या पावसाचे जास्तीत जास्त पाणी जमिनीत मुरविणे तसेच अधिक पावसात अतिरिक्त पाण्याचा शेताबाहेर सुरक्षितपणे निचरा करणे आवश्यक आहे. हरभऱ्याकरिता अनुकूल जमीन तयार करण्यासाठी रुंद वरंबा-सरी लागवड पद्धत फायदेशीर ठरते.

रब्बी हंगामामध्ये हरभऱ्याची रुंद वरंबा-सरी पद्धतीने पेरणी करता येते; तसेच उन्हाळी भुईमूग रुंद वरंबा-सरी पद्धतीने घेता येतो. हरभरा पिकामध्ये रुंद वरंबा तयार करून, त्यावर हरभरा पिकाच्या ३ किंवा ४ ओळी ३० सें.मी. अंतरावर याप्रमाणे पेरणी करावी. यामध्ये ४ ओळी घ्यावयाच्या असतील तर पाच फुटांवर सऱ्या पाडाव्यात. ४ फुटांचा रुंद वरंबा (१२० सें.मी.) मिळतो. त्यावर दोन ओळींतील अंतर ३० सें.मी. ठेवावे. हरभरा पिकाच्या चार ओळी घ्यावयाच्या असतील तेव्हा ४ फुटांवर (१२० सें.मी.) सऱ्या पाडाव्यात. ३ फुटांचा (९० सें.मी.) रुंद वरंबा मिळतो. त्यावर ३० सें.मी. अंतरावर पिकाच्या तीन ओळी घ्याव्यात.

**रुंद वरंबा सरी पद्धतीचे फायदे :** या पद्धतीमुळे चांगली मशागत होऊन बियाण्यांसाठी चांगले वरंबे (सीडबेड) तयार होतात. पीक रुंद वरंब्यावर असल्याने पिकाला नेमके पाणी मिळते. दोन्ही बाजूने असलेल्या सरींमुळे अतिरिक्त पाण्याचा योग्य निचरा होण्यास मदत होते. यामुळे पाणी व हवा यांचे संतुलन राखले जाते. पिकाची जोमदार वाढ होऊन उत्पादनातही वाढ होते. बी.बी.एफ. (रुंद वरंबा- सरी) यंत्राने एकाच वेळी आवश्यक रुंदीचे वरंबे दोन्ही बाजूंना सऱ्यांसह तयार होतात. बियाणे पेरणी व खते देण्याचे कामही त्याचवेळी होते. त्यामुळे वेळ, मजुरी खर्च, इंधन यात बचत होते.

खोल सरीमुळे त्यामध्ये डवरणी करणे, खते देणे, आंतरमशागतीची कामे, औषधांची फवारणी, गरज पडल्यास तुषार संच ठेवणे सोपे होते. त्यामुळे पिकाची नासाडी होत नाही. रुंद वरंबा- सरी पद्धतीने पेरणी केल्यामुळे पारंपरिक पद्धतीपेक्षा बियाण्याची अधिक बचत होते. पांढऱ्या मुळांची वाढ वरंब्यावर झपाट्याने होऊन फांद्यांच्या संख्येत, पर्यायाने उत्पादनात २०-३०% वाढ होते.

**रुंद वरंबा-सरी टोकणयंत्र**

अकोल्याच्या डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाने रुंद वरंबा- सरी पद्धतीवर विविध पिकांची पेरणी करण्याकरिता तसेच पिकांच्या आंतरमशागतीसाठी यंत्र विकसित केलेले आहे. या यंत्राच्या सहाय्याने मूग, उडीद, सोयाबीन, ज्वारी, मका, भुईमूग, कपाशी व तासांमधील अंतर ४५ सें.मी. असलेल्या सर्व पिकांची पेरणी करणे शक्य आहे. विशिष्ट कोनात असलेल्या सीड प्लेटच्या सहाय्याने पेरणी केली जाते व सोबत खत सुद्धा देता येते. रिजरच्या सहाय्याने रुंद वरंबा व सरी निर्माण होते. उत्पादनात ३० टक्के वाढ व मजुरांची बचत होते.

**पेरणीसाठी यंत्र तयार करणे**

**(पद्धत क्रमांक एक) :** * सर्वप्रथम पेरणीचे अंतर ठरवून घ्यावे. उदा. हरभरा पीक पेरणीसाठी दीड फूट किंवा १८ इंच अंतर असल्यास पीक पेरणीसाठी पद्धत खालीलप्रमाणे आहे. * या पद्धतीने पेरणीकरिता दोन ओळींतील अंतर १८ इंचावर असावे. तसेच १ फुटाची सरी दोन्ही बाजूने शेवटी काढावी. * या पद्धतीने लागवडीकरिता ट्रॅक्टरची मागची चाके पलटून लावावीत, जेणेकरून मागील चाकांच्या एकदम मागे सरी काढणारे फाळ घेणे शक्य होऊन आवश्यक अंतर (७ फूट) ठेवण्यास मदत होते. * या पद्धतीने वरंब्याची रुंदी वाढवून चार ओळींची १.५ फूट अंतरावर लागवड करण्यात येते.

**पद्धत क्रमांक दोन :** * ट्रॅक्टरच्या वरंबा रुंदीमध्ये बदल करावा लागत नाही. या पद्धतीने पेरणीकरिता सर्वप्रथम दोन्ही लोखंडी चाके काढून घ्यावीत. पेरणीचे दाते असलेल्या फ्रेमचा मध्य काढून चिन्ह अंकित करावे. मध्यापासून ६ इंचांवर पहिला व त्यापुढील ६ इंचांवर दुसरा दाता फिट करावा. यानंतर १ फुटाच्या अंतरावर अनुक्रमे तिसरा व चौथा दाता फिट करावा. * अशा पद्धतीने पेरणीचे चार दाते फिट केल्यावर टायर व सरीच्या फाळाचा मध्य एका रेषेत आणावा आणि सरीचे फाळ फिट करावे. हे शेवटच्या दात्यापासून ९-१२ इंच अंतरावर फिट होतात व या पद्धतीने पेरणी करता येते.

* दोन ओळींतील अंतर जमिनीच्या मगदुराप्रमाणे ठरवावे. पिकाची जास्त वाढ होत असल्यास दीड फूट तर मध्यम किंवा कमी वाढ होत असल्यास १ फूट अंतर ठेवावे. ■